मिरा भाईंदर महानगरपालिका
परिवहन उपक्रम
नामदार जगन्नाथ नाना शंकरशेट बस डेपो, आर.टी.ओ कॅम्प कार्यालयाजवळ,
स्वातंत्र सैनिक यशवंत शंकर म्हात्रे मार्ग, घोडबंदर, ता.जि.ठाणे - 401107

दि.05/03/2024

# // प्रेस नोट //

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत 08 मार्च 2024 "जागतिक महिला दिनानिमित्त" दिवसभर महिलांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बसमधून मोफत प्रवासाची सुविधा**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत शहराअंतर्गत व शहराबाहेर ठाणे, बोरीवली पर्यंत प्रवासी बसेस चालविण्यात येत आहेत.

08 मार्च 2024 रोजी "जागतिक महिला दिन" मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. त्यामुळे "जागतिक महिला दिनाचे" औचित्य साधून सामाजिक बांधिलीकी म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसमधून दिवसभर महिलांना मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से यांनी सुचना दिलेल्या आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत मागील तीन वर्षापासून 08 मार्च "जागतिक महिला दिनानिमित्त" परिवहन सेवेच्या बसमधून दिवसभर मोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली असून 08 मार्च 2021 रोजी 11,552, दि.08 मार्च 2022 रोजी 21,463 व 8 मार्च 2023 रोजी 25,838 महिलांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बसमधून मोफत प्रवास केला होता.

मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से यांचे निर्देशानुसार दि.08 मार्च 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या सर्व बसमधून महिलांना दिवसभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करन देण्यात येत आहे. तरी, या सुविधेचा जास्तीत जास्त महिला प्रवाशांनी लाभ घ्यावा असे मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से यांनी आवाहन केले आहे.

(अनिकेत मानोरकर)
अति.आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका